Good Relations
India

| | |
|---|---|
| CLIENT | Orient Black Swan |
| PUBLICATION | Loksatta |
| EDITION | Mumbai |
| DATE | December 17, 2011 |
| PAGE NO | 9 |



## ग्रंथविश्व

### हवामान बदलाचे राजकीय अर्थशास्त्र

# उष्मांक खेळाची विकसित जगाची 'कर्बस्मृती'

पृथ्वीचे वातावरण तापत चालले आहे आणि हवामानातील प्रतिकूल बदल हे त्याचे कारण आहे, पण या हवामान बदलाचा विचार करताना काही प्रमुख मतप्रवाह पुढे आलेले दिसतात. एक प्रवाह तर हवामान बदलाचा उगाच बागुलबुवा केला जात असल्याचे म्हणत या समस्येचे गांभीर्य साफ नाकारणारा आहे. दुसरा हे एक संकट असल्याचे मानतो, परंतु त्यासंबंधी जागतिक व्यासपीठावर सुचविले जाणारे उपाय हे आपल्या आर्थिक स्वार्थ आणि प्रगतीच्या आड येणारे असल्याचे सांगून त्यांना ठोकरून लावणारा आहे. हे उपाय म्हणजे मूळ रोगापेक्षा लक्षणांवर केवळ मलमपट्टी करणारे आहेत असे मानणारे आणि अधिकाधिक प्रदूषण फैलावण्याचा आपला अधिकारच असल्याचा आविर्भाव राखणारीही काही मंडळी आहेत. अलीकडेच दक्षिण आफ्रिकेत दरबन येथे पार पडलेल्या हवामानविषयक आंतरराष्ट्रीय परिषदेनेही या मतमतांतरांचा ताजा नमुना पेश केला आहे. याच दरबन परिषदेच्या तोंडावर प्रकाशित झालेल्या ज्येष्ठ पत्रकार-लेखक प्रफुल्ल बिडवई यांच्या 'द पॉलिटिक्स ऑफ क्लायमेट चेंज ॲण्ड द ग्लोबल क्रायसिसः मॉडगेजिंग अवर फ्युचर' या पुस्तकातून या वादंगातील आणखी एक वेगळाच पैलू पुढे आलेला दिसतो. बिडवई हे केवळ लेखक नाहीत, तर पर्यावरण आणि सामाजिक विषयाचे अभ्यासक आणि सक्रिय कार्यकर्तेही असल्याने ते या मानवजातीच्या भवितव्यालाच खाईत लोटणाऱ्या समस्येवर सजग नागरी समाज हेच उत्तर असल्याचे मानतात. त्याउलट या समस्येचे व्यापारीकरण करणाऱ्या कार्बन क्रेडिट, जैविक इंधन शेती वगैरेसारख्या कमअस्सल उपायांची खिल्ली उडविताना, ते यामागे दडलेल्या क्षुद्र राजकीय-अर्थशास्त्राची उकल करतात.

पृथ्वीगोलाची उत्तर आणि दक्षिण ध्रुव अशी भौगोलिक विभागणी होत असली तरी आर्थिक निकषावरही जगाची विकसित उत्तर आणि विकसनशील दक्षिण अशीच सरळसोट विभागणी झालेली दिसून येते. औद्योगिक क्रांतीची बीजे उत्तरेतील युरोपात रोवली गेली आणि त्या बळावर आर्थिक भरभराटीची फळेही त्यांनी आजवर चाखली आणि निसर्गदत्त संसाधनांची मनमानी पिळवणूकही केली. त्या देशांतील ही निसर्गदत्त संसाधने आटत गेली. मग आपले आर्थिक साम्राज्य अनिर्बंधपणे भौगोलिक सीमा पार करून अन्य देशांत फैलावत नेण्याचा त्यांना हव्यास जडला. भांडवल आणि तंत्रज्ञानाच्या बळावर साकारल्या जाणाऱ्या या हव्यासाला 'जागतिकीकरण' या नावाखाली वेग दिला गेला. विकसनशील देशांनी आपल्या अर्थव्यवस्थेचे मूलतत्त्व म्हणून जलदगतीने आणि अनिर्बंध आर्थिक वाढीचा अंगीकार करावा यासाठी त्यांना नियमित डोस पाजत राहण्याची यंत्रणाच या जागतिकीकरणातून तयार केली. जलद आर्थिक वाढीच्या म्हणजे आठ ते दहा टक्के दराच्या 'जीडीपी'वादाने विकसनशील देश ग्रासले जाणे




मग ओघानेच सुरू झाले, पण त्यातून आर्थिक सत्तेचा अक्ष हा उत्तरेकडून दक्षिणेकडे कलू लागला. आजच्या घडीला युरोप-अमेरिकेला दहा टक्के सोडाच, आधीच्या वर्षाइतकाही आर्थिक विकास दर सांभाळता येणे दुष्कर झाले आहे, तर चीन-भारत या जगातील अग्रेसर व वेगवान अर्थव्यवस्था बनल्या आहेत. चीन तर जगाचे मुख्य उत्पादन केंद्र (फॅक्टरी ऑफ द वर्ल्ड) बनले आहे. तर त्याच वेळी जगातील सर्वाधिक कर्बवायू हवेत सोडणारे आणि त्यायोगे पृथ्वीचा उष्मांक वाढविणारे देश म्हणून भारत, चीन, ब्राझील, दक्षिण आफ्रिका या देशांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले गेले. बिडवई यांनी प्रस्तुत पुस्तकात या देशांचा त्यांच्या आद्याक्षरांच्या आधारे 'बेसिक' देशसमूह म्हणून उल्लेख केला आहे. पिळवणुकीच्या अमाप शक्यता असलेल्या जगातील उदार व उदयोन्मुख बाजारपेठा म्हणून उल्लेख होत असलेल्या भारत, चीन, रशिया, ब्राझील या 'ब्रिक' अशा संक्षिप्त रूपाने संबोधल्या गेलेल्या देशसमूहाचे 'बेसिक' हे नवे विरोधाभासी रूप ठरावे.

सरलेल्या २०१० सालात पृथ्वीने कमीसमी नव्हे ९५० प्रकारचे निसर्गाचे वेगवेगळे उत्पात झेलले. लक्षणीय बाब म्हणजे यातील ९० टक्के उत्पात हे हवामान बदलाच्या स्पष्ट परिणामातून घडले आहेत. पृथ्वीची तापमान नियंत्रित करण्याची नैसर्गिक यंत्रणा बदलली आहे, कारण वाढते सीमेंटचे जंगल, प्रदूषणकारी उद्योगधंद्यांमधील वाढ, बाजारू चैन आणि मोटारी वगैरेतून वातावरणात सोडल्या जाणाऱ्या हरितगृह वायूंची (ग्रीन हाऊस गॅसेस) पातळीही वाढली आहे. यातून निसर्गाचे चक्रच भयानकपणे बिघडत चालले आहे. वसुंधरा अधिकाधिक निसर्गाच्या आघातांची शिकार बनत चालली आहे. हिमनगांचे स्थलांतर; उत्तर ध्रुवावरील बर्फाचे आवरण वेगाने वितळत आहे; समुद्राची पातळी त्यातून उंचावत आहे. त्यातून कधी वाऱ्याची दिशा व गती हिंसक रूप धारण करते; कुठे महापूर तर कुठे उष्ण हवेची वादळे आणि कुठे तरी सरासरीपेक्षा कडाक्याची थंडी यामुळे नागरी जीवन उद्ध्वस्त होण्याबरोबरच प्रचंड जीवित आणि मालमत्तेची हानी सारे जग अनुभवत आहे. २०१० सालात घडलेल्या उत्पातातून जागतिक समुदायाला तब्बल १३० अब्ज अमेरिकी डॉलरचा भुर्दंड सोसावा लागला आहे. विकसित उत्तरेकडून मागास दक्षिणेला अधिकृतपणे पुरविल्या जाणाऱ्या विकासनिधीपेक्षा ही रक्कम मोठी आहे आणि हीच सध्या सुरू असलेल्या संघर्षाची ठिणगी असल्याचे बिडवई सांगतात. म्हणूनच वातावरणातील कर्ब वायू उत्सर्जन रोखण्यासाठी निर्धारित केल्या गेलेल्या लक्ष्य व मर्यादांचे पालन करणे 'बेसिक' देशसमूहांना सध्या सोडाच आणि भविष्यातही कदापि शक्य होणार नाही, असे बिडवई यांनी स्पष्टपणेच म्हटले आहे. आपल्या संस्कृतीत जशी ब्राह्मणांसाठी वेगळा न्याय देणारी मनुस्मृतीची व्यवस्था केली गेली आहे, तशाच धाटणीची ही उच्चभ्रू, विकसित जगताला वेगळा न्याय देणारी 'कर्बस्मृती' असल्याचा कुटिराघातही ते करतात. क्योटो, बाली, कोपनहेगन आणि आताचा दरबन हे या संबंधाने झालेले करारमदार त्याचीच वेगवेगळी रूपे असल्याचे ते सांगतात. कार्बन उत्सर्जन रोखण्यासाठी सुरू झालेली कार्बन क्रेडिट योजना म्हणजे या समस्येचे केले गेलेले व्यापारीकरणच ठरते. बिडवई यांनी प्रस्तुत पुस्तकात अशा योजनांचा फोलपणा सोदाहरण मांडला आहे. आजच्या घडीला युरोपमध्ये कार्बन व्यापाराची बाजारपेठ चार अब्ज डॉलरवर पोहोचली आहे; परंतु कार्बन उत्सर्जन रोखण्यात त्या देशांना फारसे यश आलेले दिसत नाही. स्वच्छ व पर्यावरणस्नेही म्हणून अणुऊर्जेच्या पुरस्कारावर ते सडकून टीका करतात. जैविक इंधनाची शेती वगैरेचे सुरू असलेले फाजील लाडही त्यांना अमान्य आहेत. बिडवई यांचा पक्ष हा स्वाभाविकपणे 'बेसिक' देशसमूहाच्या बाजूचा असला तरी, दारिद्र्य निर्मूलनाच्या उद्देशाने प्रगतीची कास धरलेल्या विकसनशील देशांना हवामानविषयक आंतरराष्ट्रीय नियमांशी कटिबद्धता पाळता येणार नाही, अशा भारताने आंतराष्ट्रीय व्यासपीठावर रेटलेल्या 'मुत्सद्दी' भूमिकेचा मात्र ते अस्वीकार करतात.

बिडवई यांनी गरीब विरुद्ध श्रीमंत किंवा निसर्गसंपन्न आणि वंचित अशा नव्या वर्गसंघर्षाचा या सबंध चर्चेला पैलू बहाल केला आहे. देशोदेशीची सरकारे ही अधिकाधिक लोकविन्मुख बनत चालली असून, त्यांची तोंडदेखली लोकशाही व शासन व्यवस्था ही मूठभर भांडवलदार आणि आर्थिक मक्तेदार जागतिक संस्थांच्या हातातील बाहुले बनली आहेत. या राजकीय निर्णायकीतून शासनप्रक्रियेत जनशक्ती ही किनाऱ्यावर लोटली गेली आहे. जगासमोर अनेक एकमेकांत गुंफलेल्या समस्यांचा डोंगर उभा राहिला आहे. सध्या जगाला भेडसावत असलेल्या आर्थिक मंदीच्या संकटाचे मूळही हेच आहे. सध्याची हवामानविषयक समस्या जितकी जागतिक आहे तसेच राजकीय-आर्थिक अराजकाच्या स्थितीलाही जागतिक परिमाण आहे. नव्या जाणिवेने तळागाळातून उभ्या राहणाऱ्या जनचळवळीतून या समस्येवर समग्र समाधान मिळू शकेल, असा विश्वास मात्र बिडवई व्यक्त करतात.

**'द पॉलिटिक्स ऑफ क्लायमेट चेंज ॲण्ड द ग्लोबल क्रायसिस : मॉडगेजिंग अवर फ्युचर'**
**लेखक : प्रफुल्ल बिडवई,**
**प्रकाशक : ओरिएंटल ब्लॅकस्वान**
**पृष्ठे : ३९२, मूल्य : ७५९ रु.**

**सचिन रोहेकर**
sachinrohekar@gmail.com